P.T.C. Education Society's
Sau. Rajanitai Nanasaheb Deshmukh
Arts, Commerce & Science College,
Bhadgaon Dist- Jalgaon 424105
www.srndcollege.org.in
www.srndcelibrary.in
bhadgaoncollege@yahoo.com
NAAC Re- Accredited Grade - 'B'
Phone No. (02596)213364
Fax No. (02596) 213464
Hon'ble. Nanasaheb S.O.Wagh
Chairman
Dr. N.N.Gaikwad (M.A. Ph.D.)
Principal

दिनांक : २७/११/२०२०

# सूचना

महाविद्यालयातीलकला,वाणिज्यवविज्ञानशाखेतीलसर्वविद्यार्थ्यांनासुचितकरण्यातयेतेकी, **दिनांक०१/१२/२०२० ते ०५/१२/२०२०पर्यंत**अंतर्गतचाचणीपरीक्षा) MCQ पद्धतीने ( ४० मार्क्ससाठी, (Test I- 20मार्क्स, Test II 20 मार्क्स (आयोजितकरण्यातयेतआहे . आपण शिकवत असलेल्या विषयाच्या प्रश्नपत्रिका Online पद्धतीने आपल्या विद्यार्थ्यांच्या what'sup group वर०१/१२/२०२० पर्यंत उपलब्ध करून द्यावे .ही अंतर्गत परीक्षा देणे सर्व विद्यार्थीयाना देणे बंधनकारक असुन, जे विद्यार्थी यापरीक्षेस गैरहजर राहतील ते होणाऱ्या नुकसानीस स्वतःजबाबदार राहतील .

टिप : कोविड१९ महामारी संबंधित नियमांचे पालन करून परीक्षा घ्यावयाच्या आहेत.

प्रा .एस.ए .कोळी
परीक्षा प्रमुख
Chairman
Examination Committee
S.R.N.D.Arts,Comm. & Sci. College,
Bhadgaon (Jalgaon) Pin-424105

(डॉ.एन.एन.गायकवाड)
प्राचार्य
Principal
Sau Rajanitai Nanasaheb Deshmukh
Arts,Commerce & Science College
Bhadgaon, Dist.Jalgaon

IQAC
Co-Ordinator
Sau. R. N. D. College,
Bhadgaon Dist. Jalgaon

P.T.C. Education Society's
Sau. Rajanitai Nanasaheb Deshmukh
Arts, Commerce & Science College,
Bhadgaon Dist- Jalgaon 424105
स्थापना १९७९
www.srndcollege.org.in
www.srndcelibrary.in
bhadgaoncollege@yahoo.com
NAAC Re- Accredited Grade - 'B'
Phone No. (02596)213364
Fax No. (02596) 213464
Hon'ble. Nanasaheb S.O.Wagh
Chairman
Dr. N.N.Gaikwad (M.A. Ph.D.)
Principal

# सूचना

महाविद्यालयातील कला,वाणिज्य व विज्ञान शाखेतील FY, SY, TY सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, **दिनांक०२/०३/२०२१ ते १७/०३/२०२१पर्यंत** अंतर्गत चाचणी परीक्षा) MCQ पद्धतीने (४०मार्क्ससाठी, (Test I- 20मार्क्स, Test II 20 मार्क्स ( आयोजित करण्यात येत आहे .आपण शिकवत असलेल्या विषयाच्या प्रश्नपत्रिका Online पद्धतीने आपल्या विद्यार्थ्यांच्या whatsup group वर ०१/०३/२०२१पूर्वी उपलब्ध करून द्यावे .ही अंतर्गत परीक्षा देणे सर्व विद्यार्थीयाना देणे बंधनकारक असुन, जे विद्यार्थी या परीक्षेस गैरहजर राहतील ते होणाऱ्या नुकसानीस स्वतःजबाबदार राहतील .

टिप : कोविड१९ महामारी संबंधित नियमांचे पालन करून परीक्षा घ्यावयाच्या आहेत.

(प्रा .एस.ए .कोळी)
परीक्षाप्रमुख
Chairman
Examination Committee
S.R.N.D.Arts,Comm. & Sci. College,
Bhadgaon (Jalgaon) Pin-424105

Bhadgaon, Dist Jalgaon

(डॉ.एन.एन.गायकवाड)
प्राचार्य
Principal
Sau Rajanitai Nanasaheb Deshmukh
Arts,Commerce & Science College
Bhadgaon, Dist.Jalgaon

IQAC
Co-Ordinator
Sau. R. N. D. College,
Bhadgaon Dist. Jalgaon

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

( पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव )

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/३०९५ /२०२० दिनांक: १७/११/२०२०

प्रति,

१) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक.

२) कबचौउमविंतर्गत सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि विभागांचे मा.विभागप्रमुख

विषय : विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मुल्यमापनाबाबत........

संदर्भ : मा.अधिष्ठाता मंडळातील ठराव क्र. ०२/२०२०, दिनांक १०.११.२०२०.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे संलग्नीत महाविद्यालये/ परिसंस्था तसेच विद्यापीठ प्रशाळा/ विभागातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात न बोलविता ऑनलाईन माध्यमाव्दारे अध्यापन करण्यात येत आहे.

कोवीड-१९ ची एकंदरीत परिस्थिती लक्षात घेता, विद्यापीठाने यापूर्वी ठरवून दिलेल्या निकषानुसार विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणे शक्य होणार नसल्यामुळे सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कामकाज हे ऑनलाईन माध्यमातून पुर्ण करुन घेण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मुल्यमापनासंदर्भात अद्याप कोणत्याही मार्गदर्शक सुचना प्राप्त झालेल्या नसल्याने, तसेच अंतर्गत मुल्यमापनाबाबत ब-याच महाविद्यालयांकडून विचारणा केली जात असल्यामुळे, सदरचा विषय मा. अधिष्ठाता मंडळापुढे विचारार्थ सादर करण्यात आला असता, मा. अधिष्ठाता मंडळाने खालील ठराव संमत केलेला आहे.

**मा.अधिष्ठाता मंडळ ठराव क्र.०२/२०२०, दिनांक १०.११.२०२०**

"कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थी प्रत्यक्ष महाविद्यालयात येत नसल्यामुळे यापूर्वी ठरवून दिलेल्या निकषानुसार त्यांचे मूल्यमापन करणे शक्य नसल्यामुळे तसेच या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कामकाज हे ऑनलाईन माध्यमातून पुर्ण करुन घेण्यात येत असल्याने या विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन हे प्रत्येकी २०-२० गुणांच्या ०२ ऑनलाईन टेस्ट MCQ पॅटर्नप्रमाणे घेण्यात याव्यात."

तरी विद्यापीठाच्या मा. अधिष्ठाता मंडळाने विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मुल्यमापनासंदर्भात पारीत केलेल्या उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना अवगत करावे व त्यासंदर्भात कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

(भ. प्र. पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Scanned with CamSc

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon)

1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

जा.क्र.कबचौउमवि/7-अ/694/2021 दिनांक: 10/03/2021

प्रति,

1) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक.

2) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत
सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि विभागांचे मा.विभागप्रमुख.

**विषय** :- शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये प्रवेशित पदवी अभ्यासक्रमाच्या सत्र 1, 3, 5, 7 व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सत्र 3 च्या नियमित विद्यार्थ्यांच्या अंतर्गत /बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प/ मौखिक इत्यादीं परीक्षांचे आयोजन ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने करण्याबाबत ......

**संदर्भ-** : 1) विद्यापीठाचे परिपत्रक क्र.63/2021, दिनांक 10.02.2021.
2) विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/7-अ/432/2021, दिनांक 13.02.2021.
3) मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगाव यांनी दिनांक 22.02.2021 रोजी प्रसिध्द केलेली प्रेसनोट.
4) विद्यापीठाचे परिपत्रक क्र.65/2021, दिनांक 23.02.2021.
5) मा.जिल्हाधिकारी,जळगाव यांचेकडील आदेश क्र.दंडप्र-1/कावि/2020/592,दि.06 मार्च,2021.
6) विद्यापीठ अनुदान आयोगाने DO No.F.1-1/2020 (Secy) दि.8 जुलै, 2020 च्या पत्रान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडील शासनाच्या परिपत्रक क्र. संकीर्ण 2021/प्र.क्र.6/विशि-3, दिनांक 03.02.2021 मध्ये नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालये/परिसंस्थांमधील अध्ययनाचे कामकाज दि.15 फेब्रुवारी,2021 पासून 50 टक्के क्षमतेच्या उपस्थितीत सुरू करणेबाबत तसेच विद्यार्थ्यांचे नियमित प्रात्यक्षिके ही बॅचवाईज रोटेशन व ऑफलाईन पध्दतीने पूर्ण करण्यात येऊन त्या-त्या वर्गाच्या प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन यथावकाश करण्यात येईल,याबाबत संदर्भांकित 01 वर नमूद परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले होते.

तथापि, संदर्भांक्ति पत्र क्र. 3 व 5 नुसार जळगाव जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये नियमित वर्ग सुरू करण्यास दि.15 मार्च 2021 पर्यंत स्थगीती देण्यात आली असून, ऑनलाईन शिक्षणप्रणाली सुरु ठेवावी, असे निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगाव यांनी संदर्भांकित पत्र क्र.5) अन्वये कोव्हीड-19 संदर्भातील नियमावलीचे पालन करुन सर्व प्रकारच्या परीक्षा व चाचण्या घेता येतील, असे निर्देश दिलेले आहेत. तथापि,धुळे व नंदूरबार जिल्ह्यातील महाविद्यालयातील अध्यापनाचे कामकाज हे 50टक्के क्षमतेच्या उपस्थितीत सुरू आहे.

उपरोक्त नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने मा.प्रभारी कुलगुरू, मा.अधिष्ठाता, मा.सहयोगी अधिष्ठाता यांच्यात **अंतर्गत /बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प/मौखिक** परीक्षांचे आयोजनासंदर्भात दि.8 मार्च,2021 रोजी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने या परीक्षांचे आयोजन **ऑनलाईन** व **ऑफलाईन** पध्दतीने करण्याबाबत ठरले आहे.

त्या अनुषंगाने प्राप्त आदेशान्वये शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये प्रवेशित तीन वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या सत्र 1,3,5 व चार वर्षीय पदवी अभ्यासकमाच्या सत्र 1,3, 5, 7 व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सत्र 1 व 3 च्या नियमित विद्यार्थ्यांच्या **अंतर्गत /बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प/मौखिक इत्यादीं परीक्षांचे** आयोजन व मूल्यमापनाच्या कार्यपध्दतीबाबत खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.:-

1) वरील नमूद प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन त्या-त्या ठिकाणची कोव्हीड-19 प्रादूर्भाव संदर्भातील स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन **महाविद्यालयीन/परिसंस्था/प्रशाळा/शैक्षणिक विभाग** स्तरावर **ऑनलाईन** किंवा **ऑफलाईन** पध्दतीने करण्यात यावे.

2) वरील परीक्षांच्या आयोजनाबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भांकित 6) वरील पत्रान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना आणि महाराष्ट्र शासनाने कोव्हीड-19 संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे तसेच या संदर्भात स्थानिक प्राधिकरण वेळोवेळी जे-जे आदेश/नियम/मार्गदर्शक सूचना जाहीर करतील त्यांचे कोटेकोरपणे पालन करुन अंमलबजावणी करावी.

3) प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुखांनी बॅचवाईज प्रात्यक्षिक परीक्षेचे वेळापत्रक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेल, अशा पध्दतीने महाविद्यालयाच्या/त्या-त्या शैक्षणिक प्रशाळा/ विभागाच्या संकेतस्थळावर व सूचना फलकावर तसेच समाज माध्यमातून (Whatsapp/Telegram etc.) त्वरीत जाहीर करावे.

Bhadgaon. Dist Jalgaon

4) बहिस्थ परीक्षक म्हणून आपल्या महाविद्यालयातील किंवा त्याच शहरातील दुसऱ्या महाविद्यालयातील मान्यताप्राप्त शिक्षकांची नियुक्ती प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुखांनी करावी.

5) प्रात्यक्षिक परीक्षेसाठी महाविद्यालयातील/ मान्यताप्राप्त परिसंस्थेतील/ विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/ शैक्षणिक विभागातील विषयनिहाय किमान दोन मान्यताप्राप्त शिक्षकांची परीक्षक म्हणून नेमणूक करावी. अपवादात्मक परिस्थितीत महाविद्यालयात एखाद्या विषयासाठी मान्यताप्राप्त शिक्षक उपलब्ध नसतील तर सदर विषयासाठी जवळील महाविद्यालयातील मान्यताप्राप्त परीक्षकांची नियुक्ती करावी.

6) विद्यार्थ्यांना **अंतर्गत /बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प/मौखिक** परीक्षेकरीता प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसल्यास, त्यांचे मूल्यमापन प्रत्यक्ष झालेल्या प्रात्यक्षिकांच्या आधारावर Zoom, Skype किंवा इतर ऑनलाईन माध्यम, PPT सादरीकरणाद्वारे किंवा दूरध्वनीद्वारे करण्यात यावे.

7) **अंतर्गत/बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प/मौखिक** परीक्षांचे आयोजन प्राधान्याने **ऑनलाईन(Online)**पध्दतीने करण्यात यावे.

वरील कार्यपध्दतीप्रमाणे **अंतर्गत /बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प/मौखिक इत्यादी परीक्षांचे** आयोजन करुन या परीक्षांचे गुण विद्यापीठास, खालील नमूद केलेल्या तारखांना विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेल्या Online ADES Software द्वारे Online रित्या सादर करण्यात यावेत, ही विनंती.

| अ. क्र. | तपशील (शैक्षणिक वर्ष 2020-21 मधील सत्र-1 चे नियमित विद्यार्थी वगळून) | अंतर्गत /बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षा,प्रकल्प/ मौखिक परीक्षांच्या मूल्यमापनाचे गुण Online रित्या सादर करावयाची तारीख |
|---|---|---|
| 1 | S.Y.B.COM -SEM-3 | 22.03.2021 |
| 2. | S.Y.,T.Y.B.A. & B.A.M.C.J. SEM-3 & 5 | 27.03.2021 |
| 3. | S.Y.,T.Y.B.Sc. SEM-3 & 5 ( Internal) | 27.03.2021 |
| 4. | U.G. MANAGEMENT SEM.-1,3 & 5 & P.G. MANAGEMENT SEM- 3 | 22.03.2021 |
| 5. | Engineering (Except SEM-1 & Direct Second Year admitted Sem.-III students) | 22.03.2021 |
| 6. | M.A. - SEM.-III | 22.03.2021 |
| 7. | M.SC.-SEM.-III, M.C.A.-SEM.3 & 5, M.C.A.(Integrated),SEM.3,5,7,9 | 27.03.2021 |
| 8. | B.Pharmacy, B.Tech.Cosmetic- (Except SEM-1 & Direct Second Year admitted Sem.-III students), M.Pharm.- SEM.-III | 27.03.2021 |
| 9. | B.A.LL.B., LL.B., LL.M.(Fresh Student) | 31.03.2021 |

कळावे,

आपला विश्वासू,

(भ. प्र. पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव:-
1) मा.प्र. वित्त व लेखा अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव
2) परीक्षा व मूल्यमापन मंडळातील सर्व उपविभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव
3) यंत्रणा विश्लेषक/ विशेष कार्य अधिकारी, संगणक केंद्र, (परीक्षा व मूल्यमापन मंडळ) क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव
4) समन्वयक, विद्यार्थी ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव

प्रत माहितीस्तव अग्रेषित:-
1) मा.कुलगुरू कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव
2) मा.प्र.कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव

Bhadgaon, Dist Jalgaon

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon )

1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

जा.क्र.कबचौउमवि/7-अ/ 726 /2021

दिनांक: 22/03/2021

प्रति,

1) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक.

2) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि विभागांचे मा.विभागप्रमुख.

**विषय** :- शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये प्रवेशित पदवी अभ्यासक्रमाच्या सत्र 1 नियमित विद्यार्थ्यांच्या अंतर्गत /बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प/मौखिक इत्यादीं परीक्षांचे आयोजन महाविद्यालयीन स्तरांवर ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत ......

**संदर्भ-** 1) विद्यापीठाचे परिपत्रक क्र.63/2021, दिनांक 10.02.2021.
2) विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/7-अ/432/2021, दिनांक 13.02.2021.
3) मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगाव यांनी दिनांक 22.02.2021 रोजी प्रसिध्द केलेली प्रेसनोट.
4) विद्यापीठाचे परिपत्रक क्र.65/2021, दिनांक 23.02.2021.
5) मा.जिल्हाधिकारी,जळगाव यांचेकडील आदेश क्र.दंडप्र-1/कावि/2020/592,दि.06 मार्च,2021.
6) विद्यापीठ अनुदान आयोगाने DO No.F.1-1/2020 (Secy) दि.8 जुलै, 2020 च्या पत्रान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना.
7) विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/7-अ/694/2021, दिनांक: 10/03/2021.

महोदय/महोदया,

वरील संदर्भीय पत्र क्र.7 अन्वये, शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या सत्र 3, 5, 7 व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सत्र 3 च्या नियमित विद्यार्थ्यांच्या अंतर्गत /बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प/मौखिक इत्यादीं परीक्षांचे आयोजन ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने महाविद्यालयीन स्तरावर करण्यात येवून, या परीक्षांचे आयोजन कशा पध्दतीने करावे. याबाबत कार्यपध्दती निश्चित करण्यात येवून गुण हे ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याविषयी कळविण्यात आले होते.

शैक्षणिक वर्ष 2020-21 मधील प्रवेशीत सत्र 1 च्या कला, वाणिज्य व विज्ञान या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा ऑनलाईन पध्दतीने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरुपात दिनांक 02 मार्च, 2021 ते 17 मार्च 2021 या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. **प्रथम वर्ष कला, विज्ञान व वाणिज्य या अभ्यासक्रमांतर्गत सत्र 1 मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे नियमित प्रात्यक्षिके ही कोवीड-19 चा वाढता प्रादुर्भाव पाहता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगशाळेत बोलवून पूर्ण करणे शक्य नसल्यामुळे, या संदर्भात प्राप्त आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, या विद्यार्थ्यांची प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिके Zoom App, Google Meet, Skype किंवा इतर ऑनलाईन माध्यमाद्वारे Demonstrate करुन किंवा इतर पध्दतीने पूर्ण करावीत, प्रात्यक्षिकांवर आधारीत अध्ययनाचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर या विद्यार्थ्यांची अंतर्गत व बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षा ऑनलाईन माध्यमाद्वारे संदर्भ पत्र क्र. 7 मध्ये नमुद केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार महाविद्यालयीन स्तरावर ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्यात याव्यात.**

तरी वरील प्रमाणे अंतर्गत व बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प/मौखिक इत्यादी परीक्षांचे आयोजन करुन या परीक्षांचे गुण विद्यापीठास, खालील नमूद केलेल्या तारखांना विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेल्या Online ADES Software द्वारे Online रित्या सादर करण्यात यावेत.

| अ. क्र. | तपशील (शैक्षणिक वर्ष 2020-21 मधील सत्र-1 चे नियमित विद्यार्थी ) | अंतर्गत व बहिस्थ प्रात्यक्षिक परीक्षा,प्रकल्प / मौखिक परीक्षांच्या मूल्यमापनाचे गुण Online रित्या सादर करावयाची तारीख |
|---|---|---|
| 1 | FYB COM -SEM-1 | 08.04.2021 |
| 2. | FYBA, F.YBAMCJ, DPA- SEM- 1 | 16.04.2021 |
| 3. | FYBSc., FY BVOC- SEM- 1<br>(प्रथम वर्ष विज्ञान सत्र 1 या वर्गाची अंतर्गत व बहिस्थ परीक्षेंचे आयोजन करुन गुण सादर करावे) | 23.04.2021 |

Bhadgaon, Dist Jalgaon

तसेच वरील परीक्षांच्या आयोजनाबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भांकित पत्र क्र.6 वरील पत्रान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना आणि महाराष्ट्र शासनाने कोव्हीड-19 संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे तसेच या संदर्भात स्थानिक प्राधिकरण वेळोवेळी जे-जे आदेश/नियम/मार्गदर्शक सूचना जाहीर करतील त्यांचे काटेकोरपणे पालन करुन त्याप्रमाणे अंमलबजावणी करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

आपला विश्वासू,

(भ. प्र. पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव:-

1) मा.प्र. वित्त व लेखा अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव
2) परीक्षा व मूल्यमापन मंडळातील सर्व उपविभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव
3) यंत्रणा विश्लेषक/ विशेष कार्य अधिकारी, संगणक केंद्र, (परीक्षा व मूल्यमापन मंडळ) क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव
4) समन्वयक, विद्यार्थी ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव

प्रत माहितीस्तव अग्रेषित:-

1) मा.कुलगुरू कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव
2) मा.प्र.कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव